नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक ९३ * * अकोला * सोमवार, दिनांक ६ ऑक्टोबर २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## हिसारमध्ये तरुणाची हत्या

■ वृत्तसंस्था, हिसार, दि. ५ :
हरियाणातील हिसार येथे दिवसाढवळ्या एका तरुणाची हत्या करण्यात आली. दोन गुन्हेगारांनी दुकानात घुसून तरुणावर १४ वेळा चाकूने वार केले. त्यानंतर हल्लेखोर मोटारसायकलवरून पळून गेले. ही संपूर्ण घटना दुकानात बसवलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. हल्लेखोर तरुणावर चाकूने वार करताना दिसत आहेत. एकाने गोळीबार करण्याचा प्रयत्नही केला, पण पिस्तूल लोड झाले नाही. हल्लेखोर निघून गेल्यानंतर, तो तरुण दुकानाबाहेर जखमी होऊन कोसळला. जवळच्या लोकांनी त्याला ताबडतोब रुग्णालयात नेले, जिथे त्याचा मृत्यू झाला.

अग्राग्रलेख

खरीखरी..

## शहाजींचे आश्वासन

आज अहिल्यानगर येथे आपला देश चालवणारे गृहमंत्री अमित शहाजी यांनी जी गोड बातमी दिली. ती शेतकऱ्यांसाठीच्या सध्याच्या अत्यंत वेदनायदायी दिवसात खरोखर आनंदित करणारी आहे. आपल्या म्हणजेच महाराष्ट्राच्या सरकारने नुकसानीचा अहवाल पाठवावा, सविस्तर पाठवावा आणि त्यानंतर शहाजींनी म्हटल्याप्रमाणे मोदीजी तात्काळ व वायू वेगाने मदत पाठवतील. असे अमित शहा यांनी आश्वासन दिले आहे. आपल्या महाराष्ट्र सरकारच्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी आत्तापर्यंत नुकसानीचे आकडे पाठवलेले नसतील, त्यामुळेच नुकसान पीडीतां बाबतचा अहवाल अद्याप त्यांना केंद्राकडे पाठवता आलेला नसेल. गृहमंत्र्यांच्या आश्वासनानंतर हा अहवाल पाठवणे आणि तो तातडीने पाठवणे अत्यंत गरजेचे आहे. सणासुदीच्या काळाचे हे दिवस आहेत, पीडित शेतकऱ्यांचे हात संपूर्णपणे मोकळे झालेले आहेत. त्यामुळेच या मोकळ्या हातांना मोदीजींनी भरभरून मदतीचा हात देऊन भरघोस मदतीचा पुरवठा करावा, अशी केवळ शेतकऱ्यांची नाही तर संपूर्ण महाराष्ट्राची मागणी आहे. आपले अमित शहाजी आज अत्यंत तळमळीने बोलले, त्यांनीही आपले अंतरंग खोलले आणि शेतकऱ्यांनी जे काही झेलले त्याबद्दल सहानुभूती व्यक्त करून शेतकऱ्यांना मदतीचा जो काही दिलासादायक आणि चांगल्या अनुभूतीचा शब्द दिला. त्याबद्दल केंद्रीय मंत्री शहाजी अभिनंदनास पात्रच आहेत. आपले राज्य छत्रपती शिवरायांचे सतत गुणगान गात असते. छत्रपती हे त्या काळात आदर्शवादी आणि द्रष्टे राज्यकर्ते होते. त्यांना महाराष्ट्राने जो काही मान दिला आहे तो आजही समायोचित आहे.

'जे का रंजले गांजले त्यांसी म्हणे जो आपुले,
तोचि राजा ओळखावा सेवाभाव दाखवावा'

याउपर आता आम्हाला असे म्हणावेसे वाटते की, 'आता आमचे एकच सूक्त करा बळीराजाला कर्ज मुक्त, आहे तुमच्याच हातात फक्त दयाभाव दाखवावा' यापेक्षा अधिक आपण अजून काय म्हणू शकतो. केवळ महाराष्ट्राच्याच नाही तर देशाच्या अनेक भागात आपत्तीचे हे संकट आलेले आहे. या अशा आपत्तीचा मुकाबला करताना महाराष्ट्रा सारख्या श्रीमंत राज्याच्याहघ तोंडाला फेस आल्यासारखे वाटते आहे. याचाच अर्थ हे संकट भीषण आहे. शेतकरी वणवण भटकतो आहे कारण काय करावे आणि काय करू नये ते शेतकऱ्याला सुचत नाही. जे अत्यंत कोमल बुद्धीचे आहेत ते आपला जीव देऊन त्यांची सुटका करून घेत आहेत. जे थोडे निग्रही आहेत, ते सरकारी मदतीची वाट बघताहेत. सरकारकडे याचना करताहेत, त्यामुळेच आता आपल्या सरकारने दिल्लीश्वरांना जगदीश्वर म्हणून त्यांच्याकडे याचना करावी आणि आपल्यावरील महाभयंकर संकटाचा मुकाबला करण्यासाठी बळ द्यावे धीर द्यावा, अशी अपेक्षा योग्यच आहे. कठीण काळ असला तरी शेतकऱ्यांनी आत्महत्येचे पातक करू नये असे सर्व मंडळी सांगतात. पण सुखासुखी कोणताही शेतकरी आत्महत्या करत नाही. जेव्हा सर्व मार्गाने कोंडी होते आणि काय करावे हे सुचतही नाही तेव्हाच शेतकरी आत्महत्या करतो आत्महत्या करून तो बिचारा शेतकरी मुक्त होतो. त्यानंतर त्याच्या कुटुंबावर जी भीषण आपत्ती येते त्याचे उत्तर कोणाकडेच नसते. केंद्रीय गृहमंत्री अमित शहाजी यांना शहाजी म्हटल्यामुळे छत्रपती शिवरायांचे पिताजी शहाजीराजे यांच्यासारखे नामसाधर्म्य दिसते आहे. छत्रपती शहाजीराजे किंवा छत्रपती शिवाजी राजे हे प्रजाभिमुख राजे होते. यावेळी अमित शहाजींनी प्रजाभिमुख भावनेचे शब्द उच्चारलेले आहेत त्याबद्दल आपण त्यांना धन्यवाद दिले पाहिजेतच. आता त्वरित कारवाई होण्यासाठी या सरकारने कंबर कसावी, हीच महाराष्ट्राच्या जनतेची अपेक्षा आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# बळीराजाला केंद्राचा पाठिंबा

## अमित शहा यांची शेतकऱ्यांना मदतीची ग्वाही

■ महासागर प्रतिनिधी, अहिल्यानगर, दि. ५ :
राज्यातील अनेक भागांत झालेल्या अतिवृष्टी आणि नैसर्गिक आपत्तींमुळे झालेल्या शेतीच्या नुकसानावर केंद्र सरकार गांभीर्याने पावले टाकत असून, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत केली जाईल, अशी ठाम ग्वाही केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज दिली.

आहिल्यानगरमधील कार्यक्रमात बोलताना शहा यांनी सांगितले की, राज्यात ६० लाख हेक्टरहून अधिक क्षेत्रातील पिकांचे नुकसान झाले असून, हे लक्षात घेता केंद्र सरकारने वित्तीय वर्ष २०२५-२६ साठी महाराष्ट्राला ३१३२ कोटींचा निधी मंजूर केला आहे. यातील १६३१ कोटी रुपयांचे वितरण एप्रिल महिन्यातच करण्यात आले असून उर्वरित निधीही लवकरच दिला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.



राज्य सरकारच्या प्रयत्नांचे कौतुक करत शहा म्हणाले की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील सरकारने २२१५ कोटींचे मदत पॅकेज जाहीर केले असून, शेतकऱ्यांना प्रत्येकी १०,००० रोख मदत आणि ३५ किलो अन्नधान्यदेण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे हजारो कुटुंबांना दिलासा मिळणार आहे. तसेच, ई-केवायसीच्या अटी शिथिल करताना शॉर्ट टर्म फायनान्स कर्जाच्या वसुलीवरही तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे. शालेय परीक्षांमध्ये व भूराजस्व वसुलीमध्येही सूट देण्यात आली असून, या सवलती शेतकऱ्यांवरील आर्थिक ताण कमी करतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

केंद्र सरकारला राज्यातील नुकसानीचा सविस्तर अहवाल लवकरात लवकर पाठवावा, अशी विनंतीही अमित शहा यांनी यावेळी केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाही महाराष्ट्रातील शेतकऱ्यांबद्दल अत्यंत आत्मीयता असून, "पंतप्रधान कधीही मदतीला उशीर करणार नाहीत," असे आश्वासन त्यांनी दिले. शेतकऱ्यांच्या मदतीसाठी एनडीएच्या आमदारांनी मुख्यमंत्री सहायता निधीत आपला एक महिन्याचा पगार दिला आहे, तसेच अनेक खाजगी संस्था व ट्रस्टही पुढे सरसावले आहेत. ही मदत केवळ आर्थिक नव्हे, तर भावनिक आधारही असल्याचे मत शहा यांनी मांडले.

अमित शाह यांच्या या घोषणेमुळे राज्यातील आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, केंद्र व राज्य सरकार एकत्र येऊन परिस्थितीवर मात करतील, असा विश्वास शेतकरी वर्गात निर्माण झाला आहे.

## नेपाळमध्ये भूस्खलन आणि पुरामुळे कहर
## ५० जणांचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, काठमांडू, दि. ५ :
गेल्या दीड दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे नेपाळमधील सामान्य जनजीवन विस्कळीत झाले आहे. मुसळधार पावसामुळे भूस्खलन आणि पुरामुळे रस्ते बंद झाले आहेत, पूल वाहून गेले आहेत आणि किमान ५० जणांचा मृत्यू झाला आहे. अजूनही अनेक जण बेपत्ता आहेत आणि बचाव पथके त्यांचा शोध घेत आहेत.

नेपाळ आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या (एनडीआरआरएमए) प्रवक्त्या शांती महत यांनी सांगितले की, ११ जण पुरात वाहून गेले आहेत आणि अजूनही बेपत्ता आहेत. बचाव पथके त्यांना शोधण्यासाठी अथक परिश्रम घेत आहेत. त्यांनी असेही सांगितले की, खराब हवामानामुळे अनेक भागात मदत कार्यात अडथळा येत आहे, ज्यामुळे प्रभावित भागात पोहोचणे कठीण होत आहे. भूस्खलनामुळे अनेक प्रमुख रस्ते बंद झाले आहेत आणि पुरामुळे अनेक पूल वाहून गेले आहेत, शेकडो प्रवासी अडकले आहेत.

## पश्चिम बंगालमधील दार्जिलिंगमध्ये पूल कोसळला
## २० जणांचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, दिल्ली, दि. ५ :
उत्तर बंगाल आणि विशेषतः दार्जिलिंगच्या डोंगराळ भागात पुराने थैमान घातले असून या पुरात प्रचंड नुकसान झाल्याची माहिती समोर येत आहे. या पुरात अनेकांचा मृत्यू झाला असून एकूण मृतांची संख्या २० च्या वर गेली आहे. या पार्श्वभूमीवर पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी नबन्ना (राज्य सचिवालय) येथे एक उच्च-स्तरीय बैठक घेतली.

ममता बॅनर्जी यांनी २४/७ नियंत्रण कक्ष सुरू केला असून, त्या स्वतः परिस्थितीवर लक्ष ठेवून असल्याचे त्यांनी सांगितले आहे. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री आणि इतर अधिकारी सोमवारी उत्तर बंगालला भेट देणार आहेत. उत्तर बंगाल आणि दक्षिण बंगालमधील अनेक भागात काल रात्री काही तास अचानक आलेल्या मुसळधार पावसाने आणि बाहेरून आपल्या राज्यात नदीचे अतिरिक्त पाणी आल्याने निर्माण झालेल्या पूरस्थितीमुळे मी खूप काळजीत पडले आहे, असे ममता बॅनर्जी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हणाल्या आहेत. मुख्यमंत्र्यांनी असेही सांगितले की, उत्तर बंगालमध्ये १२ तासांत ३०० मिलीमीटरपेक्षा जास्त इतका पाऊस अचानक झाला. याबरोबरच संकोश नदीमध्ये आणि भूतान व सिक्कीममधून येणाऱ्या नदीच्या पाण्यात एकाच वेळी प्रवाह वाढला.

## राज्यासमोर वातावरण बदलाचा सर्वात मोठा प्रश्न

■ महासागर प्रतिनिधी, अहिल्यानगर, दि. ५ :
सध्या जगासमोर वातावरण बदलाचा सर्वात मोठा प्रश्न असून, याचे थेट परिणाम मराठवाड्यात जाणवत आहेत. यंदा मे महिन्यात पावसाळा सुरू होऊन ऑक्टोबर मध्येही पाऊस सुरू आहे. अनेक ठिकाणी सात-सात वेळा अतिवृष्टी झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे, केवळ पिकेच नव्हे तर जमिनीही खरडून गेल्यामुळे रबीचे पीक घेणेही शेतकऱ्यांसाठी मोठे आव्हान बनले आहे. या पार्श्वभूमीवर, कार्बन डायऑक्साइडचे उत्सर्जन आणि ग्रीन हाऊस गॅसेस कमी करणे अत्यावश्यक असल्याचे मत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले.



### सीएनजी मोठा बदल मुख्यमंत्री फडणवीस

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते आज कोपरगाव मधील सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखानाच्या देशातील पहिल्या क'कॉम्प्रेस्ड बायोगॅस (सी.एन.जी.) व स्प्रे ड्रायर पोटॅश ग्रॅन्युएल्प्रकल्पाचे उद्घाटन झाले. या कार्यक्रमावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. पेट्रोल, डिझेल आणि कोळशावर आधारित ऊर्जेचे स्त्रोत देशाला परकीय चलन खर्च करायला लावतात आणि कृषी क्षेत्रावर मोठे संकट आणतात. त्यामुळे अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांना चालना देणे महत्त्वाचे आहे, असे त्यांनी सांगितले. सौर ऊर्जेच्या वापरामध्ये महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर असून, आता कॉम्प्रेस्ड बायोगॅस हा ऊर्जा स्त्रोतांच्या परिवर्तनातील सर्वात मोठा बदल असेल, असे फडणवीस यांनी नमूद केले.

## भारताचे पाकिस्तानला २४८ धावांचे लक्ष्य

■ वृत्तसंस्था, स्पोर्ट्स डेस्क, दि. ५ :
महिला एकदिवसीय विश्वचषकात भारताने पाकिस्तानसमोर विजयासाठी २४८ धावांचे लक्ष्य ठेवले आहे. कोलंबो येथे खेळल्या जाणाऱ्या या सामन्यात पाकिस्तानने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला. भारतीय संघ ५० षटकांत २४७ धावांवर सर्वबाद झाला. हरलीन देओलने सर्वाधिक ४६ धावा केल्या. जेमिमा रॉड्रिग्जने ३२ आणि प्रतिका रावलने ३१ धावा केल्या. आठव्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या रिचा घोषने २० चेंडूत नाबाद ३५ धावा केल्या आणि भारताला २४७ धावसंख्या गाठून दिली. पाकिस्तानकडून डायना बेगने ४ बळी घेतले. कर्णधार फातिमा सना आणि सादिया इक्बालने प्रत्येकी २ बळी घेतले.



## पोलीस विभागात मोठे फेरबदल
## ८२ डिप्टी एसपीच्या बदल्या

■ वृत्तसंस्था, लखनौ, दि. ५ :
उत्तर प्रदेश पोलिस विभागातून मोठी बातमी समोर आली आहे. उत्तर प्रदेश पोलिस विभागात मोठा फेरबदल करण्यात आला आहे. ८२ पोलिस उपअधीक्षकांची बदली करण्यात आली आहे. बदली झालेल्या अधिकाऱ्यांची यादीही जाहीर करण्यात आली आहे. ज्या जिल्ह्यांमध्ये डीएसपींची बदली करण्यात आली आहे त्यात लखनऊ, कानपूर नगर, गोरखपूर, गौतम बुद्ध नगर, वाराणसी, प्रयागराज, अयोध्या आणि मेरठ यासारख्या प्रमुख जिल्ह्यांचा समावेश आहे.

## लोकल, एसटी, बेस्ट, मेट्रो, मोनोसाठी आता एकच मुंबई १ कार्ड
## पंतप्रधानांच्या हस्ते लोकार्पण

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ५ :
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) एकात्मिक तिकीट प्रणालीअंतर्गत मुंबई १ स्मार्ट कार्ड आणि मुंबई १ ॲप तयार केले आहे. हे कार्ड आणि ॲप सेवेत दाखल करण्याची प्रतीक्षा मागील काही दिवसांपासून असून आता मात्र ही प्रतीक्षा संपण्याची शक्यता आहे. या कार्ड आणि ॲपचे बुधवार, ८ ऑक्टोबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण होण्याची शक्यता आहे. तशी तयारी एमएमआरडीएकडून सुरू आहे. हे कार्ड सेवेत दाखल झाल्यास उपनगरीय रेल्वे, बेस्ट, मोनो, मेट्रो आणि एसटीतून एकाच कार्डद्वारे प्रवास करण्याचे मुंबई महानगर प्रदेशातील प्रवाशांचे स्वप्न पूर्ण होणार आहे.




एमएमआरमध्ये प्रवासासाठी नागरिक सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा पर्याय म्हणून उपनगरीय रेल्वे, बेस्ट, एसटी, मोनो, मेट्रोचा वापर करतात. या वाहतूक व्यवस्थांचा वापर करताना प्रवाशांना प्रत्येक प्रवासासाठी वेगवेगळे तिकिट खरेदी करावे लागते.

यात प्रवाशांचा वेळ जातो आणि त्यांना त्रासही होतो. ही बाब लक्षात घेऊन वेगवेगळी तिकीटे खरेदी करण्याच्या त्रासातून प्रवाशांची सुटका करण्यासाठी मुंबई १ स्मार्ट कार्ड तयार करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. त्यानुसार एमएमआरडीएने एकात्मिक तिकीट प्रणालीअंतर्गत मुंबई १ स्मार्ट कार्ड आणि मुंबई १ ॲप तयार करण्याचे काम हाती घेतले. मात्र नरेंद्र मोदी यांच्या हस्तेच या कार्डचे लोकार्पण करण्यासाठी राज्य सरकार आग्रही असल्याने लोकार्पणाची प्रतीक्षा होती.

## पाकिस्तान अविभाजित भारताचा भाग : मोहन भागवत

■ वृत्तसंस्था, सतना, दि. ५ :
राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (आरएसएस) प्रमुख डॉ. मोहन भागवत यांनी रविवारी सतना येथे सांगितले की, "पाकिस्तान हा अविभाजित भारताचा एक भाग आहे. ते घर आणि हे घर वेगळे नाही. संपूर्ण भारत हे एक घर आहे. फाळणी म्हणजे जणू कोणीतरी आपल्या घरातून एक खोली काढून टाकली. आपल्याला ती उद्या परत घ्यावी लागेल."



भाषेच्या वादाबद्दल आरएसएस प्रमुख म्हणाले, "अनेक भाषा आहेत, पण अर्थ एकच आहे. मूळ भाषेतून अनेक भाषा निर्माण झाल्या आहेत. सर्व भाषा भारताच्या राष्ट्रभाषा आहेत. प्रत्येक नागरिकाला किमान तीन भाषा माहित असाव्यात. घर, राज्य आणि राष्ट्राची भाषा माहित असली पाहिजे."

भागवत मध्य प्रदेशातील सतना येथे दोन दिवसांसाठी आले आहेत. त्यांच्या वास्तव्याच्या दुसऱ्या दिवशी रविवारी त्यांनी बाबा मेहर शाह दरबाराच्या नवनिर्मित इमारतीचे उद्घाटन केले.

सिंधी भाषेच्या जतनाबद्दल आरएसएस प्रमुख म्हणाले, "तुम्हाला सिंधी भाषा परंपरेतून वारशाने मिळाली आहे. ती प्रत्येक सिंधी घरात बोलली पाहिजे. भारतातील प्रत्येक व्यक्तीला त्यांची मातृभाषा अस्खलितपणे बोलता आणि समजता आली पाहिजे. सर्व भारतीय भाषा राष्ट्रीय भाषा आहेत आणि भाषिक विविधता ही आपल्या एकतेचा श्रृंगार आहे."

बीटीआय ग्राउंडवरील एका मेळाव्यात बोलताना भागवत म्हणाले, "आपण सर्व एक आहोत. आपण सर्व सनातनी आणि हिंदू आहोत. एका इंग्रजाने येऊन आम्हाला तुटलेला आरसा दाखवून विभागले." राष्ट्राचा 'स्व' जागृत करण्याचे आवाहन करताना भागवत म्हणाले की, प्रत्येक व्यक्तीने हा प्रवास स्वतःच्या घरापासून सुरू केला पाहिजे. ते म्हणाले, २ ऑक्टोबर रोजी सांगितले की, पहलगाम हल्ल्यात दहशतवाद्यांनी हिंदूंना त्यांचा धर्म विचारल्यानंतर मारले. आपले सरकार आणि सैन्याने त्याला प्रतिसाद दिला. या घटनेने मित्र आणि शत्रू उघड केले.

## अयोध्येत घरात स्फोट

■ वृत्तसंस्था, अयोध्या, दि. ५ :
अयोध्येत एका घरात जोरदार स्फोट झाला. या अपघातात एक घर जमीनदोस्त झाले. ढिगाऱ्याखाली गाडल्याने एका तरुणाचा मृत्यू झाला. इतर दोघे गंभीर जखमी झाले. या स्फोटामुळे जवळच्या तीन ते चार घरांच्या भिंतींनाही तडे गेले. स्फोटाचा आवाज एक किलोमीटर अंतरापर्यंत ऐकू आला. जखमींना सामुदायिक आरोग्य केंद्रात (सीएचसी) दाखल करण्यात आले आणि नंतर त्यांना जिल्हा रुग्णालयात रेफर करण्यात आले. स्फोटाचे कारण अद्याप अस्पष्ट आहे. फॉरेन्सिक टीमला पाचारण करण्यात आले आहे आणि ते घटना स्थळावरून नमुने गोळा करत आहेत. पोलिसांचे एक पथकही घटनास्थळी आहे.

## ७० लाख एकर नुकसान, तरीही मदतीचा प्रस्ताव नाही

### शरद पवारांचे सरकारवर टीकास्त्र

■ महासागर प्रतिनिधी पुणे, दि. ५ :
राज्यात अतिवृष्टी आणि पुरामुळे शेतकरी उद्ध्वस्त झाला असताना, केंद्राकडून अद्याप मदत जाहीर न झाल्याने ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी एक मोठा दावा केला आहे. केंद्राकडे मदतीसाठी संपर्क साधला असता, महाराष्ट्र सरकारकडून नुकसानीचा अंतिम प्रस्ताव अद्याप आलेलाच नाही, असे मला सांगण्यात आले, असे शरद पवार यांनी म्हटले आहे. त्यामुळे राज्य सरकारने तातडीने प्रस्ताव पाठवून शेतकऱ्यांसाठी मदत मिळवावी, अशी मागणीही त्यांनी केली.



शरद पवार म्हणाले की, मुख्यमंत्री दिल्लीला जाऊन आले, केंद्रीय गृहमंत्री राज्यात दौऱ्यावर आहेत, पण मदत जाहीर होत नाही. मी केंद्राशी बोललो असता, त्यांनी राज्याचा अंतिम प्रस्तावच आला नसल्याचे सांगितले. त्यामुळे राज्य सरकारने यात दिरंगाई न करता लवकरात लवकर प्रस्ताव सादर करावा. सप्टेंबर महिन्यात विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. कृषी मंत्र्यांच्या माहितीनुसार, राज्यात सुमारे ७० लाख एकर वरील पिकांचे नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी जमिनी खरवडून गेल्या, घरे पडली आणि पशुधनाचे ही मोठे नुकसान झाले. शेतकरी एकरी ५० हजार रुपयांच्या मदतीची मागणी करत असताना, सरकारच्या पातळीवर मदतीचे घोडे अडल्याने नाराजी वाढत आहे.

शरद पवार यांनी ऊस उत्पादकांकडून मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी रक्कम घेण्याच्या निर्णयावर तीव्र आक्षेप घेतला. ते म्हणाले, शेतकरी स्वतः मदतीच्या प्रतीक्षेत असताना, त्यांच्याकडूनच सक्तीने वसुली करणे अत्यंत चुकीचे आहे. आम्ही याविषयी मुख्यमंत्र्यांच्या कानावर घालून या निर्णयाचा फेरविचार करण्याची विनंती करणार आहोत. साखर कारखान्यांच्या बैठकीत याविषयी चर्चा करून राज्य आणि केंद्राशी संवाद साधला जाईल. शरद पवार म्हणाले की, राज्यातील शेतकरी आज अतिशय बिकट परिस्थितीत आहे आणि त्याला आधार देणे हे सरकारचे नैतिक कर्तव्य आहे. सरकार पिकांच्या नुकसानीची भरपाई देऊन आर्थिक मदत करू शकेल, पण ज्या शेतकऱ्यांच्या जमिनीच वाहून गेल्या आहेत, त्यांचे पुनर्वसन कसे करणार? हा एक मोठा 'यक्षप्रश्न' आहे. अशा प्रकारचे नुकसान महाराष्ट्रात यापूर्वी कधीही झाले नव्हते. त्यामुळे फक्त सर्वेक्षण करून थांबणे उपयोगाचे नाही, तर प्रत्यक्ष आर्थिक आणि भौतिक मदतीची गरज आहे.

## सिंधुदुर्ग समुद्र दुर्घटनेतील बेपत्तांचे मृतदेह सापडले

■ महासागर प्रतिनिधी सावंतवाडी, दि. ५ :
वेंगुर्ला तालुक्यातील शिरोडा वेळागर येथील समुद्रात शुक्रवारी बुडालेल्या एकूण सातही पर्यटकांचे मृतदेह अखेर सापडले असून, या दुर्घटनेतील सातही व्यक्तींचा मृत्यू झाला आहे. गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या पोलीस शोध पथकाच्या अथक प्रयत्नांना आज रविवारी यश आले आहे. शुक्रवारी सायंकाळी ४.४५ वाजण्याच्या सुमारास ही दुर्दैवी घटना घडली होती. पर्यटनासाठी आलेल्या आठ जणांपैकी सात जणांना आपला जीव गमवावा लागला असून, एक युवती सुखरूप बचावली आहे. दोन दिवसांपासून बेपत्ता असलेल्या इरफान मोहम्मद इसाक कित्तूर (३६) आणि जाकीर निसार मणियार (१३) या दोघांचे मृतदेह आज शोधून काढण्यात आले. इरफान मोहम्मद इसाक कित्तूर यांचा मृतदेह केळुस, निवती येथील खोल समुद्रातून बाहेर काढण्यात आला.

## युक्रेनवर रशियाचा भयंकर हवाई हल्ला
### प्रवासी ट्रेन व रेल्वे स्थानकावर बॉम्बवर्षाव, ३० जणांचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, कीव्ह, दि. ५ :
रशियाने रविवारी सलग दुसऱ्या दिवशी युक्रेनवर मोठा हल्ला केला. रशियन सैन्याने रात्रभर ड्रोन, क्षेपणास्त्र आणि बॉम्ब हल्ला केला, ज्यामध्ये ५०० हून अधिक ड्रोन आणि ५० बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे डागली. या हल्ल्यात किमान पाच नागरिक ठार झाले आणि नागरी पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान झाले. या रशियन हल्ल्यामुळे युक्रेनमध्ये मोठी विध्वंस झाला आहे.



यरुशियन राष्ट्राध्यक्ष वोलोडिमिर झेलेन्स्की सलग दुसऱ्या दिवशी झालेल्या मोठ्या हल्ल्यामुळे संतापले. त्यांनी रविवारी सकाळी सांगितले की रशियाने युक्रेनच्या नऊ वेगवेगळ्या प्रदेशांमध्ये ५० हून अधिक बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे आणि जवळपास ५०० ड्रोन डागले आहेत. झेलेन्स्की यांच्या मते, हा हल्ला अत्यंत संघटित आणि व्यापक होता, ज्याचा उद्देश नागरी भागात भीती पसरवणे आणि मूलभूत सेवांमध्ये व्यत्यय आणणे होता. हा हल्ला युक्रेनच्या सुरक्षा व्यवस्थेसाठी एक मोठे आव्हान ठरला आहे.

या रशियन हल्ल्यात युक्रेनियन शहर ल्विव्हचे सर्वाधिक नुकसान झाले. स्थानिक अधिकारी आणि आपत्कालीन सेवांनुसार, ल्विव्हवर ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा वर्षाव झाल्याने चार जण ठार झाले आणि अनेक जण जखमी झाले. ल्विव्हचे महापौर आंद्री सदोवी यांनी सांगितले की या हल्ल्यामुळे शहरातील दोन जिल्ह्यांमध्ये वीजपुरवठा खंडित झाला आणि सार्वजनिक वाहतुकीवरही परिणाम झाला. त्यांनी असेही सांगितले की शहराच्या बाहेरील एका व्यावसायिक संकुलात आग लागली, जी अग्निशमन विभागाने काही तासांच्या प्रयत्नांनंतर विझवली.




# राज्यात एकाचवेळी १० हजारहून अधिक उमेदवारांना नियुक्त्या

## ▪अनुकंपा व लिपिक भरती नियुक्ती ▪नियोजनभवनात जिल्हास्तरीय कार्यक्रम ▪मान्यवरांची उपस्थिती ▪जिल्ह्यात १४० उमेदवारांना नियुक्तीपत्र वितरित

▪अकोला,दि ५ (प्रतिनिधी) :

अनुकंपा व लिपिक भरती नियुक्ती आदेश वितरणाचा जिल्हास्तरीय कार्यक्रम विविध मान्यवरांच्या उपस्थितीत नियोजनभवनात आज झाला. या कार्यक्रमात ७९ अनुकंपा व ६१ एम पीएससी उमेदवारांना अशा १४० उमेदवारांना एकाचवेळी नियुक्तीपत्र देण्यात आले. राज्यात आज ५ हजार १८७ अनुकंपा उमेदवारांना, तसेच ५ हजार १२२ एमपीएससी उमेदवारांना अशा एकूण १०,३०९ उमेदवारांना एकाचवेळी नियुक्तीपत्र देण्याचा कार्यक्रम मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार व विविध मान्यवरांच्या उपस्थितीत झाला. त्याचे थेट प्रक्षेपण नियोजनभवनात आयोजित जिल्हास्तरीय कार्यक्रम ात करण्यात आले.

खासदार अनुप धोत्रे, आमदार रणधीर सावरकर, आमदार हरीश पिंपळे, आमदार अमोल मिटकरी, जिल्हाधिकारी वर्षा मीना, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, पोलिस अधिक्षक अर्चित चांडक, महापालिका आयुक्त सुनील लहाने, उपवन संरक्षक सुमंत सोळंके, अति. जिल्हाधिकारी जोगेंद्र कट्यारे, निवासी उपजिल्हाधिकारी विजय पाटील आदी उपस्थित होते.प्रशासनाने 'फास्ट ट्रॅक'वर ही प्रक्रिया पार पाडली. आज राज्यभर ठिकठिकाणी





मोठ्या प्रमाणावर अनुकंपा तत्वावरील उमेदवारांना नोकरी मिळत आहे. शासनाने विशेष मोहिम आखून अनेक कुटुंबांना न्याय मिळवून दिला आहे, असे आमदार श्री. सावरकर यांनी सांगितले. राज्यात एकूण १०,३०९ उमेदवारांना एकाचवेळी नियुक्तीपत्र देण्याचा कार्यक्रम होत आहे. हा ऐतिहासिक क्षण असल्याचे आमदार श्री. मिटकरी यांनी सांगितले. अनुकंपा नियुक्तीची प्रक्रिया 'मिशन मोड'वर राबविण्यात आल्याचे जिल्हाधिकारी श्रीमती मीना यांनी सांगितले.

जिल्ह्यात नियुक्तीपत्र वितरित करण्यात आलेल्या उमेदवारांत राज्य शासनाचे ५२, ग्रामविकास विभागातील २२, नगरविकास विभागातील १, गृह विभागातील ४ अशा ७९ उमेदवारांचा समावेश आहे. लिपीक- टंकलेखक भरतीत एमपीएससी नियुक्त ६१ उमेदवारांनाही नियुक्तीपत्रांचे वितरण झाले. अधिक्षक श्याम धनमने यांनी सूत्रसंचालन केले.

## समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी जाती निहाय जनगणना आवश्यक : प्रा. अविनाश कोल्हे

▪अकोला,दि ५ (प्रतिनिधी) :

राष्ट्रातील सर्व समाजाच्या विकासाचा मापदंड म्हणून जाती जनगणनाकडे बघितल्या जाते ही जाती जनगणना १९५१ पर्यंत सुरू होती. पंचवार्षिक योजनांच्या विकास टप्प्याच्या अनुषंगाने अशा जाती जनगणनेच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय विकासाचा टप्पा गाठता येऊ शकत होता. मात्र १९५१ पासून जाती जनगणना बंद करण्यात आली. आता ती पुढील वर्षी १ मार्च २०२६ रोजी प्रारंभ होत आहे. मात्र या जनगणनेचे राजकीय दृष्ट्या कडू,गोड समिश्र पडसाद उमटणार असल्याचे मत राज्यशास्त्राचे मुंबई येथील व्याख्याते प्रा अविनाश कोल्हे यांनी व्यक्त केले.गत ७८ वर्षापासून सुरू असलेल्या स्थानीय बाबूजी देशमुख वाचनालयाच्या वतीने स्थानीय प्रमिलाताई ओक सभागृहात शनिवार पासून ९ दिवसीय नवरात्र व्याख्यानमाला प्रारंभ झाली.

यात प्रा अविनाश कोल्हे यांचे व्याख्यान संपन्न झाले. जातनिहाय जनगणना आणि त्यांचे परिणाम यावर प्रा कोल्हे यांनी मार्मिक विवेचन केले. ते पुढे म्हणाले, जाती निहाय जनगणनेमुळे कास्ट वार अधिक तीव्र होणार असल्याची शंका व्यक्त होत असून त्यामुळे जातीनिहाय राजकारण तीव्र होऊ शकते. आपणाकडे जाती निहाय,धर्मनिहाय पक्ष आहेत.दक्षिण भारतात तर उपजाती निहाय पक्ष सुद्धा अस्तित्वात आहेत.याचाच परिणाम जातीनिहाय जनगणनेवर होऊन या जातीनिहाय जनगणनेमुळे अनेक सामाजिक फायदे होणार असले तरी त्याच धर्तीवर तोटे सुद्धा होणार आहेत. अशा फायद्या व तोट्यांची मीमांसा होणे आज गरजेचे असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. ते म्हणाले, १८७१ साली प्रथम जनगणना अस्तित्वात आली.

# मिटकरींवर कार्यकर्त्यांचा संताप बार्शिटाकळीमध्ये राजकीय वादंग!



▪बार्शिटाकळी,दि ५ (प्रतिनिधी) :

बार्शिटाकळी तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये अंतर्गत कलहाचे वादळ उफाळले आहे. आमदार अमोल मिटकरींच्या उर्मट वागणुकीमुळे पदाधिकारी-कार्यकर्ते संतप्त झाले आहेत. मिटकरी कार्यक्रमात पदाधिकारी बोलावत नाहीत, फोन न घेतात, भेटीसाठी तासन्तास थांबवतात आणि अखेरीस 'भेटणार नाही' असा संदेश पाठवतात.शासकीय विश्रामगृह येथे झालेल्या बैठकीत माजी उपसभापती गजानन म्हैसने व कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती विनोद थुटे यांनी स्पष्ट केले की, अशा वागणुकी मुळे पक्षसंघटना ढासळत आहे, जनतेच्या समस्या मिटत नाहीत आणि विकासकामे ठप्प झाली आहेत.

'पदाची मस्ती व वागणूक ही पक्ष संघटनेच्या दृष्टीने अस्वीकार्य आहे,' अशी भूमिका या बैठकीत व्यक्त करण्यात आली. पदाधिकारी-कार्यकर्त्यांनी ठरवले की, दसऱ्यानंतर थेट राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवारांना भेटून सविस्तर तक्रार मांडली जाईल.

नाहीतर पक्ष संघटनेचा विस्तार कसा होईल हा गंभीर प्रश्न आहे.बैठकीत बार्शिटाकळी तालुक्यातील माजी तालुकाध्यक्ष, पंचायत समितीचे माजी उपसभापती, बाजार समिती संचालक, तसेच जिल्ह्यातील दर्जे दार पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये गजानन म्हैसने, विनोद थुटे यांचे नेतृत्व लक्षवेधक ठरले.

दरम्यान, आ. अमोल मिटकरी यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न निष्फळ ठरला. कार्यकर्त्यांच्या संतापामुळे बार्शिटाकळी तालुक्यात राजकीय वादंगाचे वातावरण तयार झाले आहे, आणि पक्ष संघटनेतील अंतर्गत कलह आता उघड्यावर आलेला आहे.

# तेल्हारा आगारातील जीवघेणा निष्काळजीपणा

## ▪ बसची चाके ॲक्सलसह वेगळी▪चालकाच्या धैर्यामुळे जवळपास ७० प्रवाशांचा जीव वाचला

▪तेल्हारा,दि ५ (प्रतिनिधी) :

तेल्हारा आगारातील पंचगव्हाण मार्गे अकोला गाडी अकोल्यावरून तेल्हारा येत असतांना नांदखेड नजिक आज सकाळी साडेनऊ च्या सुमारास एमएच-४० एन ९९७३ क्रमांकाच्या राज्य परिवहन बसचा आज सकाळी भीषण अपघात टळला.

प्रवाशांनी मृत्यूचा थरार अनुभवला, कारण चालत्या बसची मागील चारही चाके ॲक्सलसह पूर्णपणे वेगळी झाली, आणि बस तीन वेळा पलटी होण्याच्या स्थितीत आली.

मात्र चालक कुटाळे आणि वाहक खुमकर यांनी दाखवलेल्या प्रसंगावधानामुळे बस नदीत कोसळण्यापासून वाचली व जवळपास ७० प्रवाशांचे जीव सुरक्षित राहिले.

या घटनेमुळे तेल्हारा आगारातील बसची स्थिती व देखभाल प्रणालीवर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. स्थानिक नागरिकांनी आरोप केला आहे की वाहन निरीक्षकांकडून योग्य तांत्रिक तपासणी न करता नादुरुस्त बस रस्त्यावर सोडल्या जातात. ही बेफिकिरी प्रवाशांच्या जीवाशी खेळ करणारी ठरत असून, संबंधित अधिकाऱ्यांकडून हे दुर्लक्षित होत असल्याची तीव्र नाराजी नागरिकांनी व्यक्त केली आहे.

तेल्हारा आगारातून दररोज शेकडो विद्यार्थी, कामगार, शेतकरी आणि नागरिक प्रवास करतात. अशा नादुरुस्त बस रस्त्यावर धावणे म्हणजे सार्वजनिक सुरक्षेचा थेट भंग आहे. ही घटना एक इशारा असून, प्रशासनाने या पार्श्वभूमीवर त्वरित चौकशी सुरू करणे आवश्यक आहे.संपूर्ण घटनेची चौकशी परिवहन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत करण्यात यावी.

संबंधित वाहन निरीक्षक आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर निलंबनासह कठोर कारवाई करण्यात यावी.सर्व नादुरुस्त बसांची तात्काळ तांत्रिक तपासणी करून रस्त्यावरून हटविण्याचे आदेश द्यावेत.चालक कुटाळे आणि वाहक खुमकर यांना जीवनरक्षक म्हणून गौरविण्यात यावे.जनतेचा सवाल : 'जवाबदार कोण?'जर चालकाने प्रसंगावधान दाखवले नसते, तर आज अनेक कुटुंबे उध्वस्त झाली असती.ही घटना ही केवळ दुर्लक्ष नाही, तर प्रशासकीय जबाबदारीचा गंभीर भंग आहे.

वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तत्काळ लक्ष देऊन दोषींवर कारवाई केली नाही, तर नागरिकांकडून आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.याबाबतीत त्याला आगाराची व्यवस्थापक शर्मा यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी पत्रकारांशी बोलणे टाळले. तसेच आपला भ्रमणध्वनी बंद करून ठेवला यामुळे आगार व्यवस्थापकांनाच प्रवाशांची किती काळजी आहे हे दिसून येते.

## थोडक्यात

### अरुणाचल प्रदेश येथे होणाऱ्या स्पर्धेत प्रभातचे ३ विद्यार्थी करणार महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व

**अकोला :** प्रभात किड्स स्कूलच्या तीन बॉक्सींगपटूंनी रायगड येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धे त सहभाग घेतला होता. या स्पर्धे मध्ये प्रभातच्या तीन खेळाडूंनी उत्कृष्ट यश संपादीत केल्याने त्यांची राष्ट्रीयस्तरावर निवड झाली आहे.विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा गुणांचा विकास व्हावा या उद्देशाने क्रीडा व युवा सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय रायगड तसेच राज्यस्तरीय शालेय बॉक्सिंग क्रीडा स्पर्धा यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा क्रीडा संकुल नेहूली, अलिबाग रायगड येथे दि. २५ ते २८ सप्टेंबर २०२५ दरम्यान झालेल्या राज्यस्तरीय शालेय बॉक्सींग स्पर्धेमध्ये प्रभात किड्सची ईशिका झांबरे हिने ४२ वजनगटात प्रथम क्रमांक मिळिवला. तर गार्गी राऊत हिने ५४ ते ५७ वजनगटात प्रथम क्रमांक प्राप्त केला.

तसेच ५७ ते ६० वजनगटात शाश्वत महल्ले ह्याने सुद्धा प्रथम क्रमांक मिळिवला तसेच बेस्ट बॉक्सर्सचा अवार्ड प्राप्त करून घवघवीत यश मिळिवल्याने या सर्व विद्यार्थ्यांची इटानगर अरुणाचल प्रदेश येथे दि. २८ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर २०२५ दरम्यान ६९ व्या राष्ट्रीय शालेय स्पर्धेकरिता निवड झाली आहे. या सर्व खेळाडूंना प्रभातचे बॉक्सींग प्रशिक्षक राहुल वानखडे व रिया तराम यांचे मार्गदर्शन लाभले.प्रभातचे संचालक डॉ. गजानन नारे, संचालिका सौ. वंदना नारे, सचिव निरज आवंडेकर, प्राचार्य वृषाली वाघमारे उपस्थित होते.

उपप्राचार्य अर्चना बेलसरे, सम नव्यक मो. आसिफ व क्रीडा विभाग स्वप्निल मांदाळे, उप विभागप्रमुख आशिष बेलोकार यांच्यासह शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचार्यांनी विजयी खेळाडूंचे कौतुक केले. असून अरुणाचल प्रदेश येथे होर्णाया राष्ट्रीय स्पर्धेकरीता शुभेच्छा दिल्या आहेत.



**श्री. योगायोग नवदुर्गा महोत्सवाच्या ४७ व्या वर्षाचे औचित्य साधून मंडळाचे जेष्ठ संस्थापक श्री ह.भ.प. नाना उजवणे यांचा सत्कार गोपाल नागपूरे शिवसेना ओबीसी जिल्हा प्रमुख व कर्मभूमी फाउंडेशन परिवार अकोला तर्फे करण्यात आला.**

### ७ ऑक्टोंबर पासून तीन दिवसीय योगा शिबिर

▪अकोला,दि ५ (प्रतिनिधी) :

पतंजली योग समिती अकोला व 'युवा भारत' अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दि. ७ ऑक्टोबर ते ९ ऑक्टोबर २०२५ अशा तीन दिवस कालावधीचे इंटिग्रेटेड योग शिबिर आयोजित करण्यात आले आहे. हनुमान मंदिर जठार पेठ अकोला येथे सकाळी ६ ते ७ या वेळात सदर शिबिर घेण्यात येईल. या शिबिरात डॉ. सुहास काटे जिल्हा प्रभारी पतंजली योग समिती अकोला व कुलभूषण बोंमले युवा भारत जिल्हा प्रभारी हे मार्गदर्शन करतील. तरी सदर शिबिराचा बंधू भगिनींनी लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# पातुर येथे दसऱ्याला पोलीस अधीक्षक यांच्या सतर्कतेने मोठा अनर्थ टळला

▪पातुर,दि ५ (प्रतिनिधी) :

येथे दसऱ्याला परंपरेनुसार जगदंबा देवीची रात्रभर पातुर शहरातील मुख्य मार्गावर पालखी सोहळा निघत असतो शहरातील गुरुवार पेठ व भगत वेटाळ येथील जगदंबा देवी ही सुवर्ण नदीच्या मिश्री शाह बाबा दर्ग्याजवळ जाऊन त्या ठिकाणी मोठी महाआरती होत असते परंतु या ठिकाणी या जागेवर विशिष्ट समाजाचे चार चाकी वाहने उभी केली होती त्यामुळे महाआरतीला अडथळा निर्माण झाला होता.नागरिकांनी घटनास्थळी वाहने हठविण्याची विनंती केली असता शहरातील एका उपद्रवी व्यक्तीने नागरिकांना अप शब्दाचा वापर केल्याने तणावाची परिस्थिती निर्माण झाली याबाबत पालखी मार्ग मिरवणुकीच्या सदस्यांनी पातुर पोलिसांना याची माहिती दिली परंतु कोणत्याही प्रकारचा पातूर पोलिसांनी पाठपुरावा न केल्यामुळे नागरिकांमध्ये नाराजीचा सूर उमटला सदर घटनेचा उपद्रव होऊ नये याकरिता जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांना त्या घटनेची माहिती दिली.



घटनेची माहिती शहरात वाऱ्यासारखी पसरल्याने मोठा जमाव झाला होता.त्यामुळे संपूर्ण परिसरात शांततापूर्ण तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती.या घटनेची दखल घेत पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी घटनास्थळी उपविभागीय अधिकारी पडघन हे दाखल झाले घटनेचे गांभीर्य पाहून उपद्रवी वाहने हटविणे सुरू केले. सदर कार्यवाही रात्री दोन वाजेपर्यंत चालली होती.

# महाशक्ती नवदुर्गा,शारदादेवी,सतोंषी माता,शांततेत विसर्जन





▪हिवरखेड,दि ५ (प्रतिनिधी) :

हिवरखेड शहरात आज बारसला दुर्गा माता देवी विसर्जन दुपारी तिनवाजता पासून सूरवात होऊन रात्री दहाला शातता मय मार्गाने देवीचा जल्लोश करत विसर्जण करन्यासाठी मिरवनुक मार्गाने निघाल्या नवरात्र नऊ दिवस दसरा ऐकादशी बारस मातेचे वास्तव्य शहरात होते पुर्ण गावात चार दिवसापासून वीविध मंडळाचे महाप्रसादाने जनु चुलीला आवतन होते. या नवरात्रात विवीध मंडळाकडे सामाजीक ऊपक्रम राबवीन्यात आलेआजच्या मिरवनुकीत बावीस परवानगी पैकी चंडीका चौक मधील जयभवानी नवदूर्गा, देवळीवेसची कंगालपूरी नवदूर्गा,शैलेश कॉलनीची ओमनवदुर्गा

## डीजे कम बॅन्ड पथका समोर तरुणाई थीरकली

मंडळ, विकास मैदानची,विकास नवदुर्गा, मोठे बारगण ची नागवेली, पेठपुंयाची कीसान नवदुर्गा,तिरंगा नवदुर्गा ऊत्सव मंडळ, विजय नगरची जय भवानी व जय संतोषी माता, खारोनपुंयाची दाई बुवा नवदुर्गा मंडळ, मळीतील रामरक्षा नवदुर्गा. दत्तभारती नवदुर्गा मंडळ, गोर्धावेस ची वदेंमातरम,नवदुर्गा मंडळ स्वस्तीक कॉलनीची स्वस्तिक नवदुर्गा मंडळ, संत गाडगेनगरची संत रुपलाल नवदुर्गा मंडळ संत लहुजी श्रीराम सेना संभाजी नगर शारदादेवी बंजरग नवदूर्गा ईदीरा नगर सरस्वती नवदुर्गा बारगणपुरा लहुजी नवदुर्गा अशा चौवीस पैकी अठरा मंडळानी मिरवनूकीत ढोल ताशे बॅडपथका सहीत अंबामाता दुर्गादेवी,शारदा देवी एक संतोषी माता असा मीरवनूकीत सहभाग होता तर मोठे बारगण मधील नागवेली मंडळा कडे साप्रादायीक असे मुलीचे व मुलाचे लोणार अनाथ आश्रमाचे साप्रंदायीक मडळाने पाऊली खेळुन व वीविध अभंगावली चे गायनात मिरवनूकीत रंगत आनली ईतर मंडळा कडे ढोल ताशे व डी.जे.कम बॅड पथकाचे कर्णकर्कश अशा भक्ती गीतात तरुनाई ने नाचत देवीचा जयजय कार करत भक्तीभावाने गूलाल उधळत विसर्जण केले.

# प्रदूषण मुक्त पंगतीची पाच वर्षापासून ची परंपरा कायम



▪बाळापुर,दि ५ (प्रतिनिधी) :

बाळापूर तालुक्यातील बोरगाव वैराळे येथे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या प्लास्टिक मुक्त भारत करण्यासाठी प्लास्टिक वापर टाळण्याचे आवाहन केले होते व ग्रामपंचायत ने देखील त्या आवाहनाला प्रतिसाद देत बोरगाव वैराळे येथील श्री जागेश्वर मंदिरात स्टील चे ३०० ताट उपलब्ध करून दिले असून मंदिरात होणाऱ्या प्रत्येक महाप्रसादाच्या कार्यक्रमात प्लास्टिक च्या पत्रावळीचा वापर टाळून स्टीलच्या ताटात जेवण देण्याची परंपरा पाच वर्षांपूर्वी सुरु करण्यात आली होती ती परंपरा आजही जागेश्वर महिला नवदुर्गा उत्सव मंडळाने कायम ठेवली आहे यावर्षी देखील श्री जागेश्वर सेवा समिती ने मंदिरातील पंगतीत लागणारे ताट धुवायची मोफत सेवा दिली

महासागर

●सोमवार,दि.६ ऑक्टोबर २०२५

अकोला

पान ६

# गॅस पाईपलाईनसाठी वृक्षांची मोठ्या प्रमाणावर कत्तल

**बार्शीटाकळी :** शासन एकीकडे झाडे लावा, झाडे जगवा असा संदेश देत असताना बार्शीटाकळी ते पिंजर- कारंजा मार्गावर अदानी गॅस पाईपलाईनच्या कामासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षांची कत्तल केली जात आहे. गॅस पाईपलाईन टाकल्यानंतरही आजूबाजूची मोठी झाडे विनाकारण तोडली जात आहेत. आनंदाने वजनाखाली पैशाच्या लालचेपोटी आणि झाडे तोडण्याची परवानगी दिली जाते, मग आम्ही झाड का लावावे ?' असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांच्या मनात निर्माण होत आहे.प्राणवायू देणारी झाडे जर नष्ट झाली, तर भविष्यात काय होणार, अशी भीती नागरिक व्यक्त करत आहेत. वृक्षकत्तल मोठ्या प्रमाणावर होत असतानाही बार्शीटाकळी वनपरिक्षेत्र अधिकारी दिसत कारवाई करण्यासाठी मजबूर आहेत, अशी चर्चा तालुक्यात सुरू आहे. अटी-शर्तींचे उल्लंघन:वन विभागाने झाडे तोडण्यासाठी परवानगी दिली असली तरी, त्यामधील अटी आणि शर्तींचे अजिबात पालन होताना दिसत नाही. भ्रष्टाचार, दबाव आणि लालचेपोटी कारंजा - पिंजर- बार्शीटाकळी रस्त्यावरील झाडांची कत्तल केली जात असल्याचा गंभीर आरोप होत आहे. काही महिन्यांपूर्वीच जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली अकोलाजिल्ह्यातील प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये ५०० हून अधिक वृक्षलागवड करण्यात आली होती.

# राज्यातील धर्म चिंतन हे अधिक प्रगत-प्रा अहिरे

## बाबूजी देशमुख वाचनालयच्या व्याख्यान मालेत आज पुन्हा प्रा देवकुमार अहिरे



**■अकोला,दि १ (प्रतिनिधी) :**

आजच्या व्यवस्थेत सर्वांना राजकीय, सामाजिक इतिहासाची जाणीव आहे, मात्र आता वैचारिकता इतिहास लोक जाणून घेत आहेत. प्रत्येक इतिहासाच्या मागे वैचारिक कल्पना असतात.या कल्पना सर्वकष चिंतनाचे रूप घेत असतात. महाराष्ट्रात धर्मचिंतन,राजकीय चिंतनाला वैचारिक अधिष्ठान लाभले आहे. हे अधिष्ठान इतर राज्याच्या तुलनेने मोठे प्रगत असून राज्य हे वैचारिक पुढारपणात अग्रस्थानी असल्याचे मत पुणे येथील व्याख्याते प्रा. देवकुमार अहिरे यांनी व्यक्त केले. बाबूजी देशमुख वाचनालयाच्या वतीने स्थानीय प्रमिलाताई ओक सभागृहात सुरू असलेल्या ९ दिवसीय नवरात्र व्याख्यानमालेचे प्रा.देवरे यांनी द्वितीय पुष्प गुंफले.आधुनिक महाराष्ट्रातील धर्म चिंतन व धर्म चिकित्सा यावर प्रा अहिरे यांनी विवेचन केले.ते पुढे म्हणाले, सर्व विचारांच्या चळवळीचे नेतृत्व सर्वप्रथम महाराष्ट्राने केले आहे. महाराष्ट्र ही राष्टाची वैचारिक पृष्ठभूमी असून ती महत्वपूर्ण आहे.या राज्याने सर्वप्रथम महिला धोरण, रोजगार हमी, माहितीचा कायदा व अन्य इतिहास निर्माण केला आहे. अशा इतिहासाची उजळणी समाजाने केली पाहिजे असे मतही त्यांनी व्यक्त केले. ते म्हणाले,आपण हे आपले वैचारिक अधिष्ठान हळूहळू विसरत चाललो आहोत. त्याचप्रमाणे धर्मचिंतन हा खूप मोठा विषय असून या राज्याने २०० वर्ष धर्मचिंतन केले आहे. आधुनिक महाराष्ट्रात ही धर्मचिंतनाची चर्चा करण्यात आली आहे. सर्वप्रथम धर्म म्हणजे काय याचा उहापोह झाला पाहिजे. आज धर्माच्या नावाने खूप चर्चा सुरू आहे . विज्ञान युगात धर्म हा कालबाह्य होणार अशी ओरड पूर्वी होत होती, पण ती सपेशल खोटी ठरली असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. ते पुढे म्हणाले, धार्मिकता व धर्मांधता यामध्ये मोठा फरक आहे. धार्मिकता म्हणजे धर्माची पृष्ठभूमी, अधिकार,ज्ञान, सद्गुण, नीती आदींची झालर धार्मिकतेमध्ये दिसून येते. मात्र धर्मांधता म्हणजे धर्माच्या अधिष्ठानात एका चाकोरीत निर्माण झालेली वैचारिक कट्टरता म्हणजे धर्मांधता होय.धर्माची वेगवेगळ्या तत्ववेत्यांनी वेगवेगळी व्याख्या केली आहे. भारतीय संस्कृतीत धर्म म्हणजे संप्रदाय नव्हे तर त्याला अनेक अर्थ आहेत. समाजात धर्म या संकल्पनेचे अनेक अर्थ दिसून येतात. ते म्हणाले, स्वधर्म,जात धर्म व बोध धर्म या त्री सूत्रांचे सामाजिक चित्रण सोळा व सतराव्या शतकात करण्यात आले होते. सामाजिक जबाबदारी ही बोध धर्म शिकवते, व्यक्तिने व्यक्ती म्हणून कसे वागावे हा धर्म शिकवतो.

# जमादार मगर निलंबित !

**■अकोला,दि १ (प्रतिनिधी) :**

खदान पोलीस ठाण्यातील गुन्हे शोध (डी.बी.) पथकात कार्यरत असलेले पोलीस जमादार नितीन मगर यांना जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी शनिवारी निलंबित केल्याची माहिती समोर आली आहे. कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवून ही कारवाई करण्यात आली असून, यामुळे अकोला पोलीस दलात मोठी खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, खदान पोलीस ठाण्याचे निरीक्षक मनोज केदारे यांनी पोलीस जमादार नितीन मगर यांच्या संदर्भात कसुरी अहवाल जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे पाठवला होता. त्यानुसार प्राथमिक चौकशीनंतर नितीन मगर यांना निलंबित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

खदान पोलीस ठाणे गेल्या काही महिन्यांपासून विविध कारणांनी चर्चेत आहे. यापूर्वी देखील या ठाण्यातील दोन कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली होती. आता गुन्हे शोध पथकातील नितीन मगर यांच्या निलंबना मुळे या ठाण्याची पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी शहर व जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर आळा घालण्यासाठी 'प्रहार' संकल्पना राबविली आहे. या मोहिमेद्वारे अवैध व्यवसाय व गुन्हेगारी प्रवृत्तीवर कठोर कारवाई केली जात आहे. मात्र, काही अधिकारी-कर्मचारी या उपक्रमाला फाटा देत असल्याचे बोलले जात आहे.

# बाळापुरात दुर्गा विसर्जन शांततेत

**बाळापूर :** नवरात्रोत्सवामध्ये गेली १० दिवसापासून सुरू असलेल्या सोहळ्याची सांगता शुक्रवारी दुर्गा विसर्जनाने सांगता झाली. शहराच्या विविध भागातील नवदुर्गा उत्सव मंडळे बाजारात गोळा होऊन सजविलेल्या वाहनांनी मिरवणुकीस मुख्य बाजार चौकातून प्रारंभ करण्यात आला. उत्सव समितीचे अध्यक्ष हभप गजानन महाराज पुरी, उपाध्यक्ष प्रशांतगायकवाड यांच्या हस्ते प्रथम सहभागी झालेल्या देवीची विधीवत पूजा करण्यात आली. मिरवणुकीमध्ये शहराच्या विविध भागातील मंडळे सहभागी झाली. सार्वजनिक नवदुर्गाउत्सव मंडळ, बालनवदुर्गा उत्सव मंडळ, शिवराणा नवदुर्गा उत्सव मंडळ, आनंदकला नवदुर्गा उत्सव मंडळ, सावता माळी नवदुर्गा उत्सव मंडळ, श्रीराम नवदुर्गा उत्सव मंडळ, शिवसेना नवदुर्गा उत्सव मंडळ, वंदेमातरम नवदुर्गा उत्सव मंडळ, शिवभक्त नवदुर्गा उत्सव मंडळ, शिव गजानन नवदुर्गा उत्सव मंडळ, गुरूकृपा नवदुर्गा उत्सव मंडळ, सार्वजनिक गोणीसात नवदुर्गा उत्सव मंडळ, लोकमान्य टिळक नवदुर्गा उत्सव मंडळ, वाल्मीकी नवदुर्गा उत्सव मंडळ आदी सार्वजनिक नवदुर्गा उत्सव मंडळे मिरवणुकीत सहभागी झाले होते. बाळापुरातील मिरवणुक शांततेत पार पडली. यावेळी तहसीलदार वैभव फरतारे, उपविभागीय पोलिस अधिकारी गजानन पडघन, पोलिस निरीक्षक प्रकाश झोडगे, सहा पो. नि. संभाजी हिवराळे, सपोनि पाटील आदींसह शांतता समितीचे सर्व सदस्य, नवदुर्गा उत्सव मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



# नाल्याच्या पुरात वाहून गेलेल्या करोसिया परिवाराची सांत्वन भेट

**■अकोला,दि १ (प्रतिनिधी) :**

दिनांक २७ सप्टेंबर २०२५ रोजी जुना कपडा बाजार चौक येथे नाल्याला पूर आल्यामुळे या नाल्यात दुर्गा चौक देशमुख फाईल येथील निवासी सोनू कन्नू करोसिया वय ४० वर्ष हे नाल्यात वाहून गेले व त्यांचा मृतदेह अकोल्याहून १२० किलो मीटर दूर मानेगाव येथे पूर्णा नदी पात्रात दिनांक ३० सप्टेंबर २०२५ रोजी आढळून आला

त्यांच्या येथे सांत्वन भेटीसाठी भारतीय जनता पार्टीचे प्रदेश महामंत्री विधानसभेचे मुख्य प्रतोद आमदार श्री रणधीरभाऊ सावरकर, भारतीय जनता पार्टी महानगराचे अध्यक्ष जयंतराव मसने, महानगर सरचिटणीस ॲड देवाशिषजी काकड, माजी उपमहापौर राजेंद्र गिरी, माजी नगरसेवक राहुल देशमुख, युवा मोर्चा अध्यक्ष पवन महल्ले, प्रकाश घोगलिया, माजी नगरसेवक अमोल गोगे, सुनील बाठे, अविनाश पथरोड, रोहित डागोर उपस्थित होते.याप्रसंगी मृतकाच्या कुटुंबीयांना सर्वतोपरी मदत करण्याचा आश्वासन आमदार श्री रणधीर भाऊ सावरकर यांनी दिले व त्यांच्या कुटुंबीयांना धीर दिला.



# नागरिकांनी अभय योजनेचा लाभ घ्यावा : मुख्याधिकारी राहुल कंकाल

**मूर्तिजापूर :** राज्यातील नगरपरिषदा, नगरपंचायतींच्या क्षेत्रातील मालमत्ता करावरील शास्ती माफ करण्याचा शासन निर्णय जाहीर करण्यात आला आहे. त्यामुळे मूर्तिजापूर नगरपरिषदेद्वारे शास्ती माफ करण्यात आली आहे. या अभय योजनेचा लाभ नागरिकांनी घ्यावा.

असे आवाहन न.प. मुख्याधिकारी राहुल कंकाळ यांनी केले आहे. नगरपरिषद, नगरपंचायत क्षेत्रातील मालमत्ता करावरील शास्ती अंशतः, पूर्णतः माफ करुन कर वसुलीला प्रोत्साहन मिळण्याच्या दृष्टीने अभय योजना राबविण्याबाबत या शासनाने मान्यता दिली आहे. त्या निर्णयाच्या अनुषंगाने मूर्तिजापूर नगर परिषद हद्दीतील सर्व थकीत मालमत्ताधारकांना आवाहन करण्यात येते की, योजनेचा लाभ जास्तीत जास्त कर दात्यास मिळण्याकरिता शास्ती / व्याजाची रक्कम वगळून थकीत रकमेचा भरणा करावा.

तसेच २० ऑक्टोबरपर्यंत विहित नमुन्यात अर्ज करावा, असे आवाहन नगर परिषद मूर्तिजापूरचे प्रशासक तथा मुख्याधिकारी राहुल कंकाळ व टॅक्स अधिकारी निखिल गाडगे यांनी मूर्तिजापूर शहराच्या मालमत्ताधारकांना केले आहे.

# अकोल्याची 'गरबा क्वीन' ठरली नंदिनी बोडसे

**अकोला :** नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरात उत्साहाचं वातावरण होतं. शहरातील मुंगीलाल बाजोरिया शाळेच्या मैदानावर आयोजित गरबा स्पर्धेत यूनिव्हर्सल डान्स स्टुडिओच्या प्रशिक्षिका नंदिनी बोडसे यांनी आपल्या अद्भुत नृत्यकलेच्या जोरावर 'गरबा क्वीन ऑफ अकोला' हा किताब पटकावला.रंगीत पारंपरिक पोशाखात नंदिनीने सादर केलेला भावपूर्ण आणि लयबद्ध गरबा पाहून उपस्थित प्रेक्षकांसह परीक्षक मंडळी अक्षरशः मंत्रमुग्ध झालेत. त्यांच्या नृत्यातील ऊर्जा, अभिव्यक्ती आणि तालबद्धता पाहून निर्णायकांनी एकमुखाने त्यांना पहिल्या क्रमांकाचा मान दिला.या यशाबद्दल नंदिनीला १०० ग्रॅम चांदीची वीट आणि विविध आकर्षक बक्षिसांनी सन्मानित करण्यात आले.आपल्या आनंदाची भावना व्यक्त करताना नंदिनी बोदसे म्हणाल्या, ङ्गही माझ्यासाठी अभिमानाची आणि आनंदाची क्षणिका आहे. या यशाचं श्रेय मी माझ्या कुटुंबाला, शिक्षकांना आणि यूनिव्हर्सल डान्स स्टुडिओच्या सर्व विद्यार्थ्यांना देते.नवरात्रीच्या सांस्कृतिक उत्सवात नंदिनीच्या गरब्याने रंगत आणत अकोल्याच्या संस्कृतीत एक नवीन आनंद आणि झळाळी भरली आहे. या यशाबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.



# बाभुळगाव महसूल मंडळातील शेतकऱ्यांचे निवेदन

**■पातुर,दि ५ (प्रतिनिधी) :**

गेल्या काही दिवसांपासून सतत चालू असलेला पाऊस व दिनांक २६ व २७ सप्टेंबर रोजी झालेल्या अतिवृष्टी मुळे पातुर तालुक्यातील विशेषतः बाभूळगाव महसूल मंडळातील गावांमधील सोयाबीन, तूर, कपाशी या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे.या नुकसानीची तातडीने दखल घेऊन पंचनामे करण्यात यावेत व शेतकऱ्यांना त्वरित हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत देण्यात यावी या मागणीसाठी बाभुळगाव महसूल मंडळातील शेतकरी मोठ्या संख्येने तहसील कार्यालय पातुर येथे जमले. यावेळी शेतकऱ्यांनी तहसीलदार पातुर तथा कृषी अधिकारी पातुर यांना निवेदन देऊन आपली मागणी सादर केली.

शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर झालेले नुकसान पाहता शासनाने तत्काळ उपाययोजना करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी एकमुखी मागणी करण्यात आली. यावेळी राजेश गावंडे शेख मुख्तार, सुरेश महानकार, राजू गवई, बब्बू भाई, शंकर बराटे, गणेश महल्ले, बंडू इंगळे, राजू उगले, विनोद कडाळे ,गजानन भोपळे, शिवहरी तांबडे, गणेश काष्टे गोपाल बदरखे, गोपाल अतकर प्रदीप बर्डे , संदीप इंगळे शिवचरण गोळे संतोष वानखडे, जयराम लासुरकर यावेळी शेंकडो शेतकरी उपस्थित होते.

# लडाखचे 'गांधी' सोनम वांगचूक यांच्या अटकेच्या निषेधार्थ अकोल्यात कॅण्डल मार्च संपन्न

**■अकोला,दि ५ (प्रतिनिधी) :**

भारतातील सुप्रसिद्ध अभियंता, शिक्षण सुधारक, पर्यावरण कार्यकर्ता, जागतिक कीर्तीचे शास्त्रज्ञ व मॅगसेसे पुरस्कार विजेते, शांततेचे प्रतीक आणि राष्ट्रप्रेमाचे मूर्तिमंत उदाहरण असलेले लडाखचे प्रति महात्मा गांधी म्हणून ओळखले जाणारे मा. सोनम वांगचूक यांच्या अन्याय्य व अटकेच्या निषेधार्थ अकोल्यात आज सायंकाळी भव्य कॅण्डल मार्चचे आयोजन करण्यात आले होते.

३ इडीयट्स चित्रपटातील सुप्रसिद्ध फुंसुख वांगडू या पात्रावर आधारित प्रेरणास्थान असलेले सोनम वांगचूक यांनी देशात शिक्षण, विज्ञान, पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत विकासाच्या माध्यमातून दिलेल्या योगदानाची जगभरात दखल घेण्यात आली आहे.

मात्र, अशा व्यक्तिमत्त्वाच्या अटकेमुळे देशभरातून निषेधाचा आवाज उठत आहे. त्याच निषेधाचा भाग म्हणून आज अकोल्यातील नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, शिक्षक, विद्यार्थी आणि विविध संघटनांनी कॅण्डल मार्चच्या माध्यमातून आपला संताप व असंतोष व्यक्त केला. हा कॅण्डल मार्च आज शनिवार, दि. ४ ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी गांधी जवाहर बाग येथून मोठ्या संख्येने उपस्थित नागरिकांच्या सहभागाने सुरू झाला. हातात मेणबत्त्या व फलक घेऊन शांततेच्या मार्गाने निघालेल्या या मार्चचा समारोप हुतात्मा स्मारक, अकोला येथे करण्यात आला. मार्चमध्ये सहभागी झालेल्यांनी ङ्गसोनम वांगचूक यांना तातडीने मुक्त कराङ्ग,पर्यावरण रक्षकांचा आवाज दाबला जाऊ शकत नाहीङ्ग, शांततेच्या मार्गाने लढणाऱ्या विचारांना सलाम अशा घोषणांनी परिसर दुमदुमून टाकला.

या कॅण्डल मार्चमध्ये किसान ब्रिगेड, मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलन न्यास, निर्भय बनो जन आंदोलन, अकोला जिल्हा सर्वोदय मंडळ, मराठी पत्रकार संघ, जकेरिया फाऊंडेशन, महाराष्ट्र बहुजन पत्रकार संघ, उर्दू शिक्षक संघटना, राष्ट्र सेवादल, अखिल भारतीय समाजवादी अध्यापक संघ, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, नारीशक्ती सेवा फाऊंडेशन, अकोला वैद्य चिरादारी सामाजिक शैक्षणिक बहुउद्देशीय संस्था, जिल्हा सेवा समिती, अखिल भारत गुजराती समाज (मगनभाई उकर), आस्था योग फाऊंडेशन, छावा संघटना, लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघ, समता परिषद, महाराणा प्रताप प्रगतीशील मंडळ, विदर्भ कॅरम असोसिएशन, अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळ, जमाते इस्लामे हिंद, राष्ट्रीय लोक आंदोलन व प्रकाश पोहरे मित्र मंडळ आदींसह विविध सामाजिक संघटना व स्वयंसेवी संस्था, अकोला महानगरपालिकेतील आणि समाजातील विविध घटकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.संपूर्ण मार्च दरम्यान शांततेचे व संयमाचे पालन करून लोकशाही मार्गाने निषेध नोंदविण्यात आला. नागरिकांच्या हातातील मेणबत्त्यांनी अंधार उजळून निघाला आणि संदेश दिला सत्य, विज्ञान, शिक्षण आणि पर्यावरणासाठी लढणाऱ्या आवाजाला कोणीही गप्प बसवू शकत नाही.या ऐतिहासिक कॅण्डल मार्चद्वारे अकोल्याने सोनम वांगचूक यांच्यावरील प्रेम, आदर आणि त्यांच्या विचारांप्रती निष्ठा पुन्हा एकदा दृढपणे प्रकट केली आहे. यावेळी या कॅण्डल मार्चमध्ये प्रकाश पोहरे, गजानन हरणे, शरद वानखडे, दादाराव पाथीकर, मीरसाहेब, पुरुषोत्तम आवारे, आदी सह अनेक संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## थोडक्यात

# श्रावस्ती नगर येथे 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' ग्रंथ समाप्ती उत्साहात



**अकोला :** खडकी विभागातील श्रावस्ती नगर येथे गेल्या तीन महिन्यांपासून विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखीत 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या समाजाचे भले करणाया पवित्र ग्रंथाचे वाचन येथील आदर्श शिक्षीका सविता विनोद भगत यांनी केले. श्रावस्ती नगरातील समस्त उपासक व उपाशिका यांनी यामध्ये सहभाग नोंदविला होता. रविवार दि. ५ ऑक्टोबर २०२५ रोजी पुज्य भंते धम्मानंद यांचे पावन अमृत वाणीचे ग्रंथाची सांगता करण्यात आली. त्यांनी संपुर्ण ग्रंथाचा आशय यावेळी स्पष्ट केला. या विचाराने वागल्यास, पंचशिलेचा विचार अंगिकारल्यास मानवाला सुख-समृद्धी मिळेल असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. श्रावस्ती नगरातील महिलांनी ग्रंथ पठणाचे काम करून जगाला शांतीचा संदेश देर्णाया तथागताचा शांतीचा विचार हा जगाला तारणारा असल्याचा विचार यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून साहित्यिक पंजाबराव वर यांनी बोलतांना व्यक्त केले. डोंगरे सर यांनीही यावेळी अभ्यासपूर्ण भाषण केले. ग्रंथ समाप्ती कार्यक्रमाला श्रावस्ती महिला संघातील उपासिका सविता भगत, आशाताई इंगळे, आशाताई अबगड, सुजाता इंगोले, हिराताई इंगळे, मंदाताई वर, दिपाताई प्रधान, शारीकला भगत, चांदणी विनोद वर, जयश्री कांबळे, विशाखा मनवर, रोहिणी गायकवाड, सिंधुताई गायकवाड, सुनंदा जामनीक, आशाताई मोहोड, डोंगरे ताई, वसूकर ताई, सोनिया तायडे, भिवगुडे ताई, दामोदर ताई. भारती वानखडे, कल्पना वानखडे. आश्विनी खाडे, विशाखा आठवले, चित्रलेखा भगत, खरात ताई, चराटे ताई, जाधव ताई, खंडारे ताई, डॉ. मनिषा खंडारे, धांडे नाई, सोनाली खाडे नारी ललकारच्या कार्यकारी संपादिका सुनंदा वर आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन सविता भगत यांनी तर आभार प्रदर्शन आशा मोहोड यांनी मानले. स्नेह भोजनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# प्रभातच्या ९ खेळाडूंची विभागस्तरावर निवड

**अकोला :** प्रभात किड्स स्कूलच्या नऊ खेळाडूंनी जिल्हास्तरीय तलवारबाजी स्पर्धेत उत्कृष्ट यश प्राप्त केल्याने त्यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा संकुल व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय तलवारबाजी स्पर्धेचे आयोजन क्रीडा संकुल, अकोला येथे दि. २ ऑगस्ट २०२५ दरम्यान करण्यात आले होते.या स्पर्धेत १४ व १७ वर्षाआतील मुलांमध्ये अनुज खेंडकर, सौरभ इंगोले, आयुष आढे, ऋतुराज नागे, शर्मन पाटकर सिद्धी बेलोकार कामगिरी केल्याने त्यांनी विभागीय स्पर्धेकरीता निवड झाली आहे.

RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले.
संपादक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक **पुरुषोत्तम ढोले** फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

